# ▪▪ Module - ४ ऐतिहासिक कालखंड ▪▪

अ) वैदिक व उत्तर वैदिक कालखंड - सामाजिक, आर्थिक व धार्मिक जीवन, सभा व समिती.

ब) व्दितीय नागरीकरण कारणे.

क) राज्यांची निर्मिती, जनपद, महाजनपद, गणराज्य.

## प्रस्तावना -

सिंधू संस्कृती नंतरचा कालखंड हा वैदिक संस्कृतीचा काळ म्हणून ओळखला जातो. वैदिक संस्कृतीचे प्रचारक व प्रसारक आर्य होते. म्हणून तिला आर्यसंस्कृती असे ही म्हटले जाते. आर्य भारतात बाहेरुन आले व ते सप्त सिंधूच्या प्रदेशात राहिले. त्यामुळे या संस्कृतीचा उदय सप्त सिंधूच्या प्रदेशात झाला. प्रामुख्याने ही ग्रामीण संस्कृती असून तिने आपल्या विकास प्रकियेत सातत्याने बदल घडवून आणले. तिच्या विकास प्रवाहात कालांतराने अनेक संस्कृतीचे मिश्रण झाले. ही प्रकिया अनेक वर्षे संथपणे चालू असावी. या संस्कृतीने मानवी जीवनाच्या सर्व क्षेत्रात आमूलाग्र बदल घडविले. वैदिक वाङःमयावरून आर्यांच्या विषयी माहिती मिळते.

वैदिक संस्कृतीचा अभ्यास करताना आर्य मुळचे कुठले आणि ते भारतात कसे आले या बाबत पाश्चिमात्य आणि भारतीय इतिहासकारांच्यात मतभेद आढळतात ते पुढीलप्रमाणे-

१) **लोकमान्य टिळक** - "दि आर्टिक होम इन दी वेदाज" या ग्रंथात त्यांनी आर्य लोक अगदी प्रारंभी उत्तर ध्रुवाजवळील बर्फाच्छादित प्रदेशात रहात होते. आणि तेथून ते भारतात व इतर प्रदेशात स्थिर झालेत असे मत मांडले.

२) **मॅक्स्मूलर -** यांचे मते मध्य आशियातील लोकांची भाषा व आर्यांची भाषा बरीच मिळती - जुळती आहे म्हणून मध्य आशिया हेच आर्यांचे मूळ वस्तिस्थान होते असा त्यांनी सिध्दांन्त मांडला.

३) **रॅम्सन -** यांच्या मते "आर्य भटके व पशूपालक होते. त्यांना गवताळ कुरणांची आवश्यकता असल्याने त्यांचे वास्तव्य ईशान्य युरोपातील समशीतोष्ण प्रदेशातील होते. तेथूनच ते जगाच्या इतर प्रदेशात व भारतात आले असावेत."

४) **<u>स्वामी दयानंद सरस्वती</u>** - यांच्या मते तिबेट हे आर्यांचे मूळ वस्तिस्थान होते.

५) **<u>पं. गंगानाथ झा -</u>** या भारतीय पंडीताने आर्य हे मुळचे भारतातील आहेत असा सिध्दांत मांडला आहे.

अश्यारीतीने आर्यांच्या मूळ वस्तीस्थाना बददल बरेच विचार - प्रवाह आहेत त्यामध्ये एकमत नाही अलीकडील सर्वेक्षण नवे पुरावे यांचा विचार करता आर्य मध्य अशियातील भागात रहात असावेत असे मानण्यात हरकत नाही.

आर्य टोळयाटोळयांनी भारतात आले. संशोधकांनी त्यांच्या येण्याचा काळ पुढीलप्रमाणे सांगितला आहे.

**मॅक्समूलर** - इ.स. पू १२००

**डॉ. विंटरनिटस** - इ.स.पू २०००

**लो. टिळक** - इ.स.पू. ४०००

**डॉ. दास** - इ.स.पू. ५०००

वरीलप्रमाणे आर्य येण्याचा काळ सांगितला असला तरी बोघाजकाई शिलालेखावरून आर्याच्या आगमनाचा काळ इ.स.पूर्व १५०० च्या दरम्यान असावा त्यांनी भारतात वास्तव्य केल्यामुळे एक नवी संस्कृती वैदीक संस्कृती किंवा आर्यसंस्कृती उदयाला आली.

**<u>वैदिक वाङ:मय</u>** -

आर्यांच्या जीवनाची माहिती जाणून घेण्यासाठी वेद वाङ:मय प्रमुख साधन आहे. वैदिक वाङ:मय हे जगातील सर्व वाङ:मयात सर्वश्रेष्ठ वाङ:मय समजले जाते. भारतातील आर्यांनी जे महान वाङ:मय निर्माण केले. त्यामध्ये चारवेद ब्राम्हणे उपनिषेद, आरण्येक समग्रंथ हया सारख्या वाङ:मयाची निर्मिती झाली. हे वैदिक वाङ:मय कोण्या एका लेखकाने लिहलेले नसून त्यांची हळुहळू वाढ होत गेली. प्राचीन ऋषींनी त्यांची निर्मिती केली व ते मुखोदगत करत एका पिढीतून दुसऱ्या पिढीकडे पाठांतराच्या स्वरुपात संक्रमीत होत गेले.

**<u>आर्यांचे भारतातील आगमन आणि त्यांचा विस्तार -</u>**

हवामानाचा प्रश्न, लोकसंख्या वाढ व अन्नधान्य तुटवडा यामुळे आर्याने आपले मूळ वसतिस्थान सोडले असेल असे विव्दांनांचे मत आहे.तसेच आर्य हे वायव्येकडून खैबरखिंड ओलांडून भारतात आले. व सप्तसिंधू नदीच्या परिसरात स्थायिक होवून त्यांनी भटकी राहणी सोडली व भारतात नवीन संस्कृती निर्माण केली सुपीक जमीन, मुबलक पाणी पुरवठा, शेती व पशुपालन यामुळे त्यांच्या जीवनात स्थैर्य प्राप्त झाले. आर्य धैर्यवान, शौर्यवान, सद्दढ शरीरसौष्ठवांचे होते. त्यामुळे स्वत:च्या सामर्थ्यावर नवीन भूप्रदेशात अनेक संकटावर मात करुन आपले वास्तव्य निर्माण केले. आर्यांच्या भारतातील विस्ताराचे प्रामुख्याने पुढील भाग पडतात. पहिल्या कालखंडात आर्यांनी सिंधू नदीच्या प्रदेशात प्रवेश केला. हया प्रदेशाला त्यांनी ब्रम्हावर्त असे नांव दिले. दुसऱ्या

कालखंडात कुरुक्षेत्रापर्यंतचा भाग व्यापला. तिसऱ्या कालखंडात आर्यांनी मध्यप्रदेश म्हणजे रजपुताना आणि माळवा हया प्रदेशात आपला विस्तार घडवून आणला.

चौथ्या कालखंडात बिहार किंवा बंगालच्या दक्षिण - पुर्व भागावर आर्यांनी वर्चस्व मिळविले. या दक्षिण प्रदेशाला आर्यावर्त असे म्हणतात. विंध्य पर्वत तसेच घनदाट जंगलामुळे आर्यांनी दक्षिण भारतात प्रवेश केला. व त्याठिकाणी आपले सांस्कृतीक वर्चस्व् निर्माण केले. या दक्षिण भारताला आर्यांनी 'दक्षिण पथ' हे नाव दिले.

## सामाजिक जीवन :

वैदिक काळातील समाजजीवनाचा अभ्यास करताना त्या काळातील कुटुंबव्यवस्था, विवाहपध्दती, स्त्रियांचे स्थान, आहार, वेशभूषा, केशभुषा, अलंकार, सौदर्य प्रसाधने आणि करमणुकीची साधने, औषधे, निवासस्थाने, आश्रम व्यवस्था, शिक्षण, नैतिकता या घटकांचा विचार करावा लागतो.

### १.कुटुंब व्यवस्था :

आर्यांनी सामाजिक जीवनात व्यक्तीपेक्षा कौटुंबीक जीवनाला जास्त महत्व दिले. त्यामुळे एकत्र कुटुंब पध्दतीचा उदय झाला. दोन तीन पिढयांचे लोक एका संयुक्त कुटुंबात रहात. सर्वात वृध्द व्यक्ती कुटुंबप्रमुख म्हणून काम पहात असे. कुटुंबात स्त्रिया मुले वृध्द एकत्र रहात होती. कुटूंब प्रमुखास गृहपती किंवा दम्पती असे म्हणत. कालांतराने कुटुंब पध्दतीत बदल होवून संयुक्त कुटुंब पध्दती रुढ झाली. आज्ञा पालन, शिस्त, आदरभाव इत्यादी संस्कार कुटुंब संस्थेत जोपासले जात होते.

### २.विवाहपध्दती :

विवाह संस्था एक पवित्र संस्कार मानली जात असे तसेच ती कुटुंब संस्थेचाही महत्वाचा आधार होती. स्त्रीला पती निवडण्याचे स्वातंत्र्य होते. प्रौढ विवाह प्रचलीत होते. विवाह करणे आवश्यक समजले जाई. कारण वंशवृध्दीसाठी व युध्दासाठी शूर सैनिकांचा पुरवठा करणारी म्हणून पुत्रप्राप्तीला महत्व होते. अधिक पुत्र असणाऱ्या मातेचा गौरव केला जात असे. निपुत्रीक स्त्रीला पुनर्विवाह करण्याची परवानगी समाज देत असे. बालविवाह, जरठ विवाहप्रथा, हुंडा प्रथा समाजात नव्हती.

### ३.स्त्रियांचे स्थान :

वैदिक काळातील स्त्रियांना मानाचे स्थान होते. स्त्रियांना वेदाभ्यासाचा शिक्षण घेण्याचा अधिकार होता. पुरुषांच्या बरोबरीने स्त्रिया वाद - विवाद व चर्चा यात सहभागी होत असत. विश्ववरा, घोषा, अपाली, लोपामुद्रा, सिकता, निवावरी, उर्वशी या विव्दान स्त्रियांनी वेदांतील काही ऋचांची रचना केली. कुंटुंबात व समाजात स्त्रियांना मानाचे स्थान होते. स्त्रीला गृहीणी / गृहस्वामिनी / सहधर्मिणी असे संबोधले जात असे. वैदिक काळातील स्त्रियांच्यावर कोणतेच

बंधन नसल्यामुळे स्त्रिया पुरूषांच्या बरोबरीने सामाजिक व धार्मिक कार्यात सहभागी होत असत. विधवांना विवाह करता येत असे. स्त्रीला आपला पती निवडण्याचे स्वातंत्र्य होते. विवाह करुन पतीगृही जाणे स्त्रीचे प्रमुख कर्तव्य मानले जाई. सर्वसाधारणपणे एकपत्नीत्वाची चाल समाजात रुढ होती. परंतु श्रीमंत लोक आणि शासक एकापेक्षा अनेक विवाह करीत. स्त्रियांचे चारित्र्य उच्च दर्जाचे असे. यावरुन वैदिक काळातील स्त्रियांचे स्थान उच्च दर्जाचे होते हे दिसते.

**४.जाती संस्था :**

आर्य भारतात आले तेव्हा त्यांच्यात जाती संस्था अस्तित्वात नव्हती. समाजजीवन आणि व्यक्तीजीवनाचा गाडा सुरळित चालवण्यासाठी वैदिक काळातील लोक पसंद पडेल ते काम व व्यवसाय करू लागले. आर्य अनार्य असा फरक मानला जात नसे. जन्मावरून ठरली जाणारी वंशपरंपरागत जात मानली जात नव्हती. आंतरवर्णिय विवाह, व्यवसाय बदलणे इत्यादी परिवर्तनास परवानगी दिली जात असे.

**५. आहार :**

वैदिक आर्याचा प्रमुख व्यवसाय पशुपालन होता. त्यामुळे त्यांच्या आहारात दुग्धजन्य पदार्थाचा समावेश होता. उदा. दुध, दही, लोणी व तुप. शेतीचा व्यवसाय असल्याने भाजीपाला, कडधान्ये तांदूळ, गहू, जव, तीळ, सातू इ. पदार्थाचा दैनंदिन आहारात समावेश होता. विवाह समारंभ, सार्वजनिक उत्सव किंवा अन्य सणासुदीचे समारंभ असल्यास मांसाहार करीत असत.शेळया मेंढया, बैलाचे, रेडयाचे मांस खाल्ले जाई. गायीचे मांस निषिध्द मानले जात असे. सोमरस सोमवल्लीपासून काढण्यात येत असे. सुरा धान्यापासून काढीत असत. नशा आणणारी ही आवडीची पेये होती. सूरापान किंवा मध्यपानाचा निषेध ऋग्वेदात आढळून येतो.

**६. वेशभुषा :**

आर्यांचा पोशाख साधा होता. स्त्री - पुरुष दोघेही सारखीच वस्त्रे वापरीत असावेत. आर्य सुती व लोकरी कपडे वापरीत. ऋषी आणि वानप्रस्थाश्रमी लोक वल्कले म्हणजे झाडांच्या सालीपासून तयार केलेली वस्त्रे वापरीत ‘निवी’ नावाचे वस्त्र पुरूष कमरे भोवती गुंडाळून पंचा धोतरासारखे नेसत तर स्त्रिया परकरासारखे पातळसे वस्त्र कमरेभोवती गुंडाळत होत्या. दुसरे वस्त्र शालीसारखे पांघरत असे. स्त्री पुरुष दोघेही डोक्यावर पगडी घालत असत.

**७. केशभुषा :**

स्त्री - पुरुष दोघेही केस लांब ठेवत. तेल लावून केस विंचरण्याची पध्दत होती. स्त्रिया केसांच्या विविध रचना करीत असत. केसांची वेणी घालत असत. पुरुष दाढी मिश्या राखीत व केसांचा बुचडा बांधीत. केसांना कलप किंवा रंग लावण्याची पध्दत होती. शरीर सुगंधीत करण्यासाठी निरनिराळया उटण्यांचा व सुगंधी तेलाचा वापर करीत असत.

**८. <u>अलंकार</u>** **:**

जीवनाचा आनंद घेण्याची वृत्ती असल्यामुळे स्त्री - पुरूष लग्नप्रसंगी, समारंभ प्रसंगी वेगवेगळे वापरीत असत. कर्णफुले, बाजुबंद, बाहुबंद, बांगडया, अंगठया, मेखला, नूपुर, पैंजण, जोडवे वापरीत. अलंकार सुवर्णाचे, चांदीचे, पाचूचे, हिरे, माणिक मोती रत्ने शंख, शिंपले हस्तीदंताचे असत.

**९. <u>सौदर्य प्रसाधने</u>** **:**

स्त्री - पुरुष दोघांनाही सौदर्य प्रसाधनाची आवड असल्याचे दिसून येते. केसाचे भांग पाडणे, वेण्या घालणे, भांगात स्त्रिया सिंदूर भरीत असत, ओठांस रंग व पायास मेंदी लावीत असत. याशिवाय फुलांच्या माळा, फणी, आरसा, चिमटा, पावडरचे त्यांना ज्ञान होते.

**१०. <u>करमणुकीची साधने</u>** **:**

संगीत, गायन, नृत्य, वादन यांच्या माध्यमातून करमणूक केली जात असे संगीत वीणा, मृदुंग, तंतूवादय, ढोल, झांज, तबला, कर्करी, बासरी, दुदंभीचा समावेश होता. दुत, चौरस, जुगार, मल्लकुस्त्या, मष्टीयुध्द इत्यादीखेळांच्याव्दारे करमणुक करीत असत. तसेच घोडा व रथांच्या शर्यती कोंबडयांच्या, रेडयांच्या, बैलांच्या झुंजी लावीत. वन्य प्राण्यांची शिकार करणे हे देखील मनोरंजनाचे साधन होते. आर्य लोक भौतिक जीवनाचे पुरस्कर्ते होते.

**११. <u>औषधे</u>** **:**

आर्य लोक वैदयकिय चिकित्सक होते. रोगनाशक वनस्पती, रोग निवारण्यासाठी प्रार्थना, मंत्रविदया, विषारी प्राण्यांच्या विषबाधेपासून मुक्तता इत्यादी गोष्टीचे ज्ञान आर्यांना होते.

**१२. <u>निवास्थाने</u>** **:**

आर्यांची घरे साधी असत. घरे बांबू व चिखलमातीनी बांधलेली होती. घरात अनेक खोल्या असत. प्रत्येक घरात अग्नीकुंड असे. जवळच गुरांसाठी गोठा असे. घराची छपरे गवतांनी शाकारलेली असे. प्रत्येक घरात दिवाणखाना, झोपण्याचा खोल्या, स्वयंपाक घर, धाब्याची कोठी असे. घरबांधणीत लाकडाचा मोठया प्रमाणात वापर होत असे. घरबांधणी हा एक संस्कार मानला गेला. बांधकाम करण्यापुर्वी घरगुती विधी करण्याचा प्रकार सुरू झाला होता.

**१३. <u>आश्रम व्यवस्था</u>** **:**

व्यक्तीच्या जीवनाचे जन्मापासुन मृत्युपर्यंतचे आयुष्य सफल जावे त्यासाठी आर्यांनी आयुष्याचे प्रत्येकी २५ वर्षाचे चार भाग केले. त्या चार विभागांना ब्रम्हचर्याश्रम, गृहस्थाश्रम, वानप्रस्थाश्रम व संन्यास आश्रम म्हणतात. एकाच आयुष्यात सर्व सुख प्राप्त व्हावे. मानवी आयुष्य १०० वर्षे सुखाने जगावे यासाठी आर्यानी आश्रमव्यवस्थेची सुरुवात केली असावी.

**१४. <u>शिक्षण</u> :**

वैदिक काळात शिक्षणाला महत्व होते. गुरुकुलात शिक्षण देण्याचे काम केले जाई. गुरुगृही राहून मुलांना वेदमंत्र पठणाचे मौखीक ज्ञान घ्यावे लागे. शिक्षणातून चारित्र्य संवर्धन, बुध्दी चातुर्य यांचा विकास साधला जात असे. मुलीना शिक्षण देण्याचे कार्य स्त्री शिक्षीकाच करीत. स्त्रियांना नृत्य संगीताचे शिक्षण दिले जात असे. लेखनकला ज्ञात असावी.

**१५. <u>नैतिकता</u> :**

आर्याच्या जीवनाचा नैतिक स्तर अतिशय उच्च होता. लोकांचे जीवन सुखी आणि समाधानी असल्याने चोरी, दरोडे हे गुन्हे घडत नसत. घरातील वडिलधारे पाहुण्यांचा आदर सत्कार करीत. सत्य बोलणे हे धार्मिक कर्तव्य समजले जाई. व्याभिचार पाप समजले जाई.

## <u>आर्थिक जीवन</u> :

आर्यानी शेती व्यवसायाला सुरुवात केल्याने त्यांच्या स्थिर जीवनाला सुरुवात झाली. शेतीबरोबर त्यांनी विविध व्यवसाय करून आपला आर्थिक विकास घडवून आणला. त्याचा आढावा आपणांस पुढीलप्रमाणे सांगता येईल.

**१. <u>शेती</u> :**

आर्याचा शेती हा प्रमुख व्यवसाय होता. जंगले नष्ट करुन त्यांनी शेतीस जमीन तयार केली. नांगराला बैल जुंपून आर्य लोक शेती करीत. पाटबंधाऱ्याचे पाणी नदयांचे पाणी शेतीसाठी दिले जाई. गहू. तांदूळ, सातु, तीळ, कापूस कडधान्ये, भाजीपाला फळे, इत्यादीचे उत्पादन घेत असत. वर्षातून दोन वेळा जमिनीतून पिके घेतली जात असत.

**२. <u>पशुपालन</u> :**

शेती बरोबरच पशुपालन हा आर्यांचा मुख्य व्यवसाय होता. पशुपालनात गाई, बैल, घोडा, बकऱ्या, मेंढया, कुत्रे, गाढव इत्यादी प्राण्यांचा समावेश होता. या सर्व प्राण्यांचा उपयोग विविध प्रकारे होत असे. ज्या व्यक्तीकडे सर्वाधिक गाई असत त्यास धनवान समजले जात असे.

**३. <u>आर्यांचे उदयोग धंदे</u> :**

मुळातच आर्यांच्या गरजा कमी होत्या परंतु समाजाचा विकास जसजसा होत गेला त्याप्रमाणे गरजा ही वाढत गेल्या व त्यातून अनेक उदयोगधंदयांचा उदय झाला. त्यापैकी काही प्रमुख उदयागधंदे पुढीलप्रमाणे -

**४. <u>सुतार काम</u> :**

सर्व समाजात सुताराला महत्व होते. रथ, गाडया, नावा, घरे, शेतीची साधने, खेळणी अशा वस्तू तयार करीत

**५. <u>धातूचे काम</u> :**

ऋग्वेद काळात सोने, चांदी, लोखंड यासारख्या धातुंचा शोध लागला. धातुकाम करणारे कारागीर निरनिराळी शस्त्रे, हत्यारे, तलवारी, कुऱ्हाडी बनवीत.

**६. <u>सोनार काम</u> :**

सोन्या चांदीचे दागिने तयार करण्याचे काम सोनाराकडे असे हार कर्णफुले इत्यादी दागिने विशेष लोकप्रिय होते.

**७. <u>चर्मकार</u> :**

प्राण्यांची कातडी कमवून चर्मकार वर्ग उपजीवकेसाठी पखाली, पादत्राणे, लगाम, चाबुक, बाणाला लागणाऱ्या दोऱ्या अशा वस्तू तयार करीत असत.

**८. <u>विणकाम</u> :**

आर्यलोक कापूस व लोकर यापासून सुत व कापड तयार करीत असत. सूत कातण्याचे काम स्त्री पुरुष करीत. स्त्रिया गवतापासून उत्तम गालीचे तयार करीत.

**९. <u>व्यापार</u> :**

विदेशी व्यापाराबरोबरच अंतर्गत व्यापारही भरभरटीस आलेला होता. व्यापारासाठी भूमार्ग व जलमार्गाचा उपयोग केला जाई. धान्य, कापड, धातू आणि रत्ने या व्यापारात मुख्य वस्तू होत्या व्यापारात वस्तूंची देवघेव चालत होती. तसेच 'निष्क' नावाचे नाणे वस्तू विनिमयाचे प्रमूख साधन होते.

**१०. <u>दळणवळण व वाहतूक</u> :**

ऋग्वेदकाळात रथ, बैलगाडी प्रामुख्याने असलेली दिसून येतात. पूर्ववैदिक काळात सागरी मार्गाने दळणवळण होते किंवा नाही याबाबत विव्दांनामध्ये एकवाक्यता नाही. परंतु ऋग्वेदामध्ये अश्विन कुमारने 'भुज्यु' नावाचे जहाज बुडताना वाचविले असा उल्लेख आहे. थोडक्यात आर्यलोकांना समुद्रपर्यटनाची माहिती होती. नौकांच्या माध्यमातून परदेशांशी व्यापार करीत होते असे म्हणता येईल.

**११. <u>करआकारणी</u> :**

आर्थिक राज्यकारभार चालविण्यासाठी जमीन महसुल, युध्दातील लुट, खंडणी, नजराणे व विविध वस्तुवरील कर ही राज्याची उत्पन्नाची साधने होती. या करातून राज परिवार, शासन, लष्कर जनकल्यासाठी खर्च केला जाई. बलि नावाचा कर धान्य, पशुच्या रुपाने घेत यावरुन पुर्ववैदिक काळातील आर्थिक जीवन विकसित समृध्द होते असे म्हणता येईल.

## धार्मिक जीवन

आर्यांचे धार्मिक जीवन साधे भोळे होते. निसर्गाच्या चक्रानुसार मानवाचे दैनंदिन जीवन चालते. त्यामुळे निसर्गातील होणारे बदल व घडमोडी या दैवी शक्तीच्या क्रिया आहेत असे आर्यांना वाटत असे. म्हणून आर्यांनी निसर्गातील वेगवेगळया शक्तींना ईश्वरी रुप दिले. अशा अनेक देव - देवतांची मानवी स्वरुपात उपासना तसेच निसर्गातील वेगवेगळया शक्तींना ईश्वरी रुप दिले. अशा अनेक देव - देवतांची मानवी स्वरुपात उपासना सुखाची अपेक्षा ठेवणारी होती. नितिमत्तेला आर्यांच्या धर्मात महत्त्वाचे स्थान होते. ईश्वराची कृपादृष्टी होवून आपले जीवन सुखी संपन्न व्हावे म्हणून आर्यांनी आपल्या धार्मिक जीवनात अनेक देवदेवतांना सामावून घेतले होते.

**<u>१)आर्यांच्या देवतांचे स्वरुप :</u>**

आर्यांच्या धर्म कल्पनेतील निसर्ग देवता तीन प्रकारच्या होत्या.

**१. स्वर्गस्थ देवता - आकाश, वरुण, सुर्य, मित्र, विष्णु, उषा, सविता, आप, पुषण.**

**२. आंतरिक्ष देवता - इंद्र, वायु, पर्जन्य**

**३. भू - देवता - पृथ्वी, अग्नी, बृहस्पती, सरस्वती सोम.**

**१. <u>इंद्र</u> :**

आर्य युध्दप्रिय होते. म्हणून वीर, विव्दान, प्रतिभाशाली, प्रतापी, सहस्त्र हाताचा, देवांचा योध्दा असे ऋग्वेदात इंद्राचे त्यांनी महात्म्य वाढविले. इंद्र ही सर्वश्रेष्ठ युध्देवता व पर्जन्य देवता असल्याने त्याची प्रार्थना केल्यास युध्दात शत्रूंचा पराभव होतो व पाऊस वेळेत भरपूर पडतो अशी त्यांची कल्पना होती.

**२. <u>आकाश व पृथ्वी</u> :**

आकाश व पृथ्वीमुळे मानवी जीवन सुखी व संपन्न बनते. आकाश देवतेला वरूण म्हटले जात असे. नैतिक नियमांचे पालन सृष्टीचे नियमन व नियंत्रण वरुन देवता करते म्हणून तिला विश्वव्यापी सृष्टीकर्ता असे म्हटले आहे. पृथ्वी ही मातृदेवता असून सर्व प्राणीमात्रांचा आधार असून ती अन्नदाता सृष्टीची देवता आहे.

**३.अग्नी :**

यज्ञात आहूती दिल्यानंतर ती सर्व देवांच्याकडे पोहोचते तसेच यज्ञप्रंसगी अग्नीची पूजा केल्यास मानवाचे जीवन सुखी बनते. अग्नीच मानवाला मुक्ती देते.

**४. सुर्य व उषादेवी :**

सुर्याला संपूर्ण सृष्टीचा रक्षणकर्ता मानले. सुर्यदेवतेपासून मानवाला दीर्घायुष्य व निरोगी जीवन लाभते. उषा देवता कुठली याबद्दल जरी माहिती मिळत नसली तरी पहाटे ती रथात बसून आपल्याबरोबर सुर्याला पृथ्वीतलावर आणते आणि सर्व लोकांना कार्यप्रवृत्त करते. उषा म्हणजे अरूणोदयापूर्वीची वेळ; पहाटचे, निसर्ग सौदर्याचे प्रतिक असून ती सुर्याच्या आगमनाची चाहूल मानवाला देते.

**५. रुद्र :**

रुद्र ही आरोग्याची देवता असून ती सृष्टीतील रोगजंतूचा नाश करते. रुद्रालाच पुढे ते शिवदेवता मानले जावू लागले होते.

**६. विष्णू -**

विष्णू संसाराचा कर्ता व रक्षणकर्ता आहे त्याची प्रार्थना केल्यास आपली दु:ख दूर होतात. विष्णूचे संपूर्ण ब्रम्हांडात भ्रमण असते. त्याची कृपादृष्टी होवून आपले जीवन व्यवस्थित जगता येते अशी धारणा आर्यांची होती.

**७. यम :**

धर्म नीती नियमांचे पालन करणारी देवता असून मृत व्यक्तीला कर्मानुसार शिक्षा देण्याचे काम करतो. ही मृत्युची देवता आहे.

**८. सोम :**

यज्ञ प्रसंगी सोमरस प्राशन मोठया प्रमाणात होई. आर्य लोक सोमरसाचे प्रेमी होते त्यामुळे त्यास त्यांनी देवता मानले आहे.

याशिवाय आर्यांचे तात्वीक स्वरुपाचे देव होते. ते म्हणजे धाता, विश्वकर्मा व प्रजापती होय. यज्ञ व कर्मकांडास आर्यांच्या धार्मिक जीवनात महत्वाचे स्थान होते. विविध देवतांना प्रसन्न करण्यासाठी अनेक यज्ञ करीत असत. आर्य लोक पूर्वजांची पूजा करीत. आत्मा व पूनर्जन्मावर आर्यांचा विश्वास होता. मृत्युनंतर मृत शरीराला अग्निसंस्कार करीत किंवा पुरत होते. आर्यांनी पुरुष देवतांना प्राधान्य दिले. या देवतांची मंदिरे कुठेही नव्हती. आर्यांचा दृष्टीकोन आशावादी होता. म्हणून आर्यांनी नैसर्गिक शक्तींचे मानवी करण आणि दैवतीकरण करून पूजा करीत असत. डॉ. व्ही. एम आमटे म्हणतात “ऋग्वेद कालीन ऋषींच्या विचारामध्ये निराशावादी मागमूसही आढळत नाही. जीवन हे सत्य असो वा माया वस्तू असो वा छाया त्याचा पुरेपूर

उपभोग घेण्याची आकांशा त्याच्या ठायी दिसून येते. संपूर्ण विश्वातील निर्मीती व घडामोडीला जबाबदार एकच ईश्वर असून त्याचे विविध स्वरुपात आर्यांनी पूजा व उपसना केली.”

## सभा व समिती

उत्तर वेदकाळात राजाची सत्ता वाढत गेली. त्याच प्रमाणे मंत्र्याची संख्या देखील वाढत गेली. शासन व्यवस्थीत चालविण्याकरिता मंत्र्याची मदत घ्यावी लागे. त्यांना ‘विरस’ किंवा ‘रत्निन’ असे म्हणत.

मंत्र्यामध्ये भागदुध(करवसूल करणारा) सुत हा राजाचा रथ चालविणारा, पुरोहित(धर्माधिकारी), सैनापती (सैन्याचा प्रमुख) ग्रामीण(ग्रामप्रमुख)इ. मंत्री होते.

मंत्र्या शिवाय राजसत्तेवर नियंत्रण ठेवणाऱ्या सभा आणि समिती या दोन संस्था होत्या.

संस्थाच्या मदतीने राजा राज्यकारभार करीत असे.

**सभा -**

सभे मध्ये वयोवृध्द ज्ञानवृध्द कूलीन व धनवान लोकांचा समावेश होता. त्याच्या प्रमुखास सभापती व सदस्यास सभासद म्हणत असत. या काळात सभा राजाला न्यायदानात मदत करीत असे. प्रसंगी सभा ही ग्रामीण जीवनाशी निगडीत असावी. गांवातील सभ्य प्रतिष्ठीत श्रीमंत लोकांची गावपंचायत म्हणजे सभा संघटना असावी किंवा राज्यातील गुणवान लोकांना राजाने आपल्याकडे ठेवून घेतले असावे. परंतु सभेचा सल्ला राजावर बंधनकारक नसे. सभेमध्ये(सभागृहामध्ये)सभेतील सभासद वादविवाद करीत असत. करमणूकीसाठी दूत हा खेळ खेळीत असत. राजा ही त्यात सहभागी होई. सभेच्या बैठकींना राजा क्वचितच हजर रहात असे. सभेच्या सभासदामध्ये स्त्रिया नव्हत्या

**समिती** -

समिती सभेपेक्षा मोठी होती. सभेपेक्षा समितीला अधिक अधिकार असे. राज्यातील स्त्री पुरुषांचा या समितीत समावेश होता. सामान्य नागरीक व तरुण लोकांचा समावेश या समितीमध्ये होता. सभेपेक्षा समितीचे अधिकार ही जास्त असत राजाला समितीच्या बैठकीला हजर रहावे लागत असे राजधानीच्या शहरी समितीची बैठक होत असे. समिती राज्यासाठी कायदे व नियम करण्याचे ही कार्य करीत असे. जुलमी व दुराचारी राजाला पदच्युत करणे, नवीन राजाची निवड करणे, परकीय आक्रमकांना तोंड देण्याची व्यवस्था करण्याची जबाबदारी असे इत्यादी समितीची कामे होती सभेपेक्षा समितीचे अधिकार जास्त असत अश्या रितीने जनतेच्या वतीने कार्य करणारी अंतिम सत्ता असलेली संघटना होती.

वेदकालीन वाग:मयात सभा व समितीचा वारंवार उल्लेख आल्यामुळे सभा व समितीस त्या काळात अधिक महत्व् असावे. परंतु विशाल साम्राज्य व सम्राटांचे महत्व् वाढत जाऊन सभा व समितीचा प्रभाव कमी झाला.

अ)**<u>उत्तर वैदिक कालखंड (इ.स.पू. १२००-६००) :</u>**

ऋग्वेदानंतर जो काळ भारतात उदयाला आला त्या काळाला उत्तर वैदिक काळ म्हणतात. उत्तर वैदिक काळाचा कालखंड इ.स.पूर्व १२०० ते इ.स.पूर्व ६०० असावा. सामवेद, यजुर्वेद, अथर्ववेद आणि ब्राम्हणग्रंथ उपनिषदे, रामायण, महाभारत यांची रचना उत्तर वेदकाळात झाली. पूर्व वैदिक काळ, उत्तर वैदिक काळ यामध्ये अनेक दीर्घकाळाचे अंतर होते. या काळात पूर्ण वैदिक कालीन संस्कृतीमध्ये फार मोठे परिवर्तन झाले. आर्यांचा प्रसार उत्तर भारताबरोबर दक्षिण भारतातही झाला.

**आर्यांचा प्रादेशिक विस्तार :**

लोकसंख्या वाढीस लागल्यामुळे आर्यांना नविन प्रदेशाची गरज भासू लागली व त्यातूनच विस्तारवादी धोरण आर्यांनी स्विकारले इ.स.पू. ८०० पर्यंत लोखंडी हत्याराचा सर्वत्र वापर होत नव्हता.जंगल तोडीसाठी दगड आणि तांबे, ब्रांझच्या कुऱ्हाडी वापरल्या जात होत्या. पुढे लोखंडी हत्याराच्या वापरामुळे प्रादेशीक विस्ताराच्या प्रकियेत गती मिळाली. कुरु, पांचाल, उशीनर ही नवीन राज्ये उदयास आली. या कालखंडात जुन्या जमाती लयास गेल्या व नवीन जमातीचा उदय झाला. पुरु आणि भरत जमातींचे एकीकरण होवून कुरु ही जमात पुढे आली. कूरु आणि पांचाल या उत्तर वैदिक कालखंडातील प्रमुख जमाती होत्या. दिल्ली दुआबच्या मध्य व उत्तर भागामध्ये कुरु पांचालचे प्रभुत्व निर्माण झाले.

अ) **उत्तर वैदीक कालीन सामाजिक परिस्थिती :**

उत्तर वैदिक काळात निर्माण झालेल्या वाङ्:मयातून आर्यांच्या सामाजिक परिस्थितीत आमुलाग्र बदल झालेला आढळून येतो. त्याचा आढावा पुढीलप्रमाणे -

१. **<u>कुंटुबसंस्था</u>** :

उत्तर वेदकाळात कुटुंब संस्था स्थिरावल्या, वाढल्या. संयुक्त कुंटुब पध्दत अस्त्विात आली. या काळात पितृसताक कुटुंब पध्दती असल्याने पिता हा कुंटुबाचा प्रमुख असे. कुटुंबाना कुल म्हणून संबोधले जावू लागले. कुलमान, कुलाचार यांना महत्व आले. कुटुंब प्रमुखाच्या आदेशाचे पालन व वडिलाधाऱ्यांचा मान राखणे या गोष्टी प्रामुख्याने पाळल्या जात असत. या काळात मुले - मुली दत्तक घेण्याची प्रथा होती.

२. **<u>विवाह संस्था</u>** :

वैदिक काळाप्रमाणे उत्तर वैदिक काळात विवाह हा पवित्र संस्कार मानला जात असे. या काळात मुलगा कुलदीपक ही कल्पना अस्तित्वात आली. विवाहाचे आठ प्रकार होते.

१ ब्राम्हविवाह : विधीपुर्वक ठरवून झालेले कन्यादान

२ दैव विवाह : पुरोहिताव्दारे सालंकृत कन्यादान

३ प्रजापत्य विवाह : हुंडा न घेता झालेला विवाह

४ आर्ष विवाह : वराकडून वधूपित्यास गाय बैल अर्पण करुन वधुशी विवाह

५ गांधर्व विवाह : वधू वरांच्या संमतीचा विवाह

६ आसूर विवाह : वराकडून वधूपित्यास धन देवून वधू विकत घेणे व विवाह लावणे.

७ राक्षस विवाह : वधूस जबरदस्तीने पळवून नेवून केलेला विवाह.

८ पैशाच्य विवाह : एखादया स्त्रीवर बळजबरी करून तिला बेशुध्द करुन तिच्याशी विवाह करणे.

बालविवाह व सतीची पध्दती नव्हती. विधवा पुनर्विवाहास मान्यता होती. जाती जातीमध्ये विवाह लावण्याची पध्दत रुढ झाली. अनुलोम (उच्च् वर्णिय पुरुष् व नीचवर्णिय स्त्री) प्रतिलोम (नीच वर्णिय पुरुष व उच्चवर्णिय स्त्री) यांच्यामध्ये विवाह घडून येत असत.

३. **<u>स्त्रियांची स्थिती</u>** :

ऋग्वेद काळापेक्षा उत्तर वैदीक काळातील स्त्रियांचा दर्जा घसरलेला होता.स्त्रियांना समाजात स्थान नव्हते. मुलगी जन्मास आल्यास दु:ख व्यक्त करण्यात येत असे. मुलगा जन्माला येणे आनंदाची गोष्ट समजली जात असे.साहजिकच मुलीला वारसा हक्क नसल्यामुळे तिची योग्यता शुद्रा इतकीच गणली जात होती. मुलींचे विवाह १६ व्या वर्षी होत. बहुपत्नीत्वाची चाल मोठया प्रमाणात प्रचारात होती.या काळात मुलीच्या शिक्षणाकडे जास्त लक्ष दिले जात नसले तरीही अनेक स्त्रियांनी शिक्षणात प्रविण मिळविल्याचे दिसते. गार्गी, मैत्रेयी, गंधर्व गृहिणी व विदुषी इत्यादी स्त्रिया वेदविदयेमध्ये याज्ञवल्क्य ऋषी सारख्यांशी तत्वज्ञान आणि धर्मविषयक चर्चा सभामध्ये सहभाग घेत असत.

४. **<u>आहार व पोशाख</u>** :

या काळातील आहार पौष्टिक आणि जीवनसत्वयुक्त होता. गहू, तांदूळ, फळे, पालेभाज्या व दुधापासुन बनविलेल्या पदार्थाचा आहारामध्ये समावेश होता. या काळातील लोक मांसाहारी होते. सुती,लोकरी कपडे वापरले जात असत. श्रीमंत व राजलोक कपडयांवर सोने व चांदीचे जरीकाम करीत असत. हस्तीदंतापासून बनविलेल्या कंगव्यांनी केस स्वच्छ ठेवीत व सुगंधी तेलाचा वापर करीत. पुरुष दाढी जटा व शेंडी ठेवीत. स्त्रिया वेण्या व बुचडा घालून नाविण्यपूर्ण केशरचना करीत.

५. **<u>अलंकार</u>** :

स्त्री पुरुषांना दागदागिण्यांची आवड होती. बांगडया, कमरपटटा, पैजण, वाळे, अंगठया, नथ, कर्णभूषणे, बाहूभूषणे सर्रास वापरात होती. मोती, रत्ने, पाचू, माणिक, मोती यांनी मढविलेले सोन्याचांदीचे अलंकार ब्राम्हण व क्षत्रिय वर्ग वापरत होता. इतरही वर्गातील लोक सोन्या-चांदीचे दागिने वापरत असत.

६. **<u>सौदर्यप्रसाधने</u>** :

अलंकाराप्रमाणे चंदन, लेप, उटणे, काजळ, मेंदी, ओष्टरंग, सुगंधी तेल, फुलांचे गजरे यांचा उपयोग करीत. मंगळसुत्र व कुंकु ही सैभाग्यालेणी असावीत. उंचीवस्त्रे अलंकाराव्दारे आपल्या सौदर्याची हौस पुरवित.

७. **<u>मनोरंजन</u>** :

उत्तर वैदिक काळातील लोक वेगवेगळया पध्दतीने मनोरंजन करीत. प्रामुख्याने घोडे व रथाच्या शर्यती, दयुत खेळणे, नृत्य गायन व वादन यांचा उल्लेख करता येईल. संगीतात विविध वादयांचा उपयोग केला जात असे. त्यात दुदुंभी व मृदंग, झांज, शंख ही महत्वाची वादये होती. स्त्री, पुरुष सामाजिक व धार्मिक उत्सवामध्ये भाग घेत असत.

८. **<u>नगरांचा विकास</u>** :

उत्तर वैदिक काळात खेडयांचे रुपांतर नगरात झाले. राजविस्तार, व्यापार, उदयोगामुळे मोठ -मोठया शहराचा उदय झाला.

९. **<u>वर्णव्यवस्था</u>** :

उत्तर वेदकाळातील समाज चार वर्णामध्ये विभागला गेला होता. वर्णाचा आधार धर्म, कर्तव्य,व्यवसाय व उदयोगधंदा हा होता. ब्राम्हण - अध्ययन यज्ञ करणे, क्षत्रिय, वैश्य आणि शुद्र या चार वर्णातील लोकांचे व्यवसाय ठरलेले होते. ब्राम्हण - अध्ययन यज्ञ करणे, क्षत्रिय - योध्दे व प्रशासक असत. वैश्य - शेतकरी व्यापारी व कारागीर होते तर शुद्र - कनिष्ठ सेवक असे चार वर्ण होते. या काळात वर्णव्यवस्था जटिल बनली. लोकांना वंशपरंपरेने चालत आलेला व्यवसाय सोडून दुसरा व्यवसाय करता येत नव्हता. समाजात ब्राम्हण वर्गाचे वर्चस्व् होते.

१०. **<u>जातिव्यवस्था</u>** :

ब्राम्हण, क्षत्रिय, वैश्य आणि शुद्र या चार वर्णाचा विस्तार उत्त्र वैदकाळात झाला. समाजातील लोकांचा व्यवसाय ठरलेला होता. व्यवसायावरून जात ठरली गेली. जातीव्यवस्थेचा सर्वात जास्त फटका शुद्र वर्णीयांना बसला. शिक्षण घेणे, यज्ञ विधी करणे, मुंज करणे यावर बंदी घातलेली होती. तीनही वर्गाची सेवा करणे हेच त्यांचे मुख्य कर्तव्य बनले.

११. **<u>आश्रम व्यवस्था</u>** :

उत्तर वैदिक काळात आश्रम व्यवस्था निर्माण झाली होती. आर्यांनी मानवाच्या संपूर्ण जीवनाला चार आश्रम व्यवस्थेत विभागलेले होते. व्यक्तिविकास व योग्य रितीने साध्य करणे हा आश्रम व्यवस्थेचा हेतू होता. आर्यांच्या चार ऋण कल्पना होत्या. देवता, ऋषी, पितर आणि समाज या चार ऋणातून मुक्त होण्यासाठी आश्रमव्यवस्था निर्माण करण्यात आली.

अ) **ब्रम्हचर्याश्रम** :

ही माणसाच्या जीवनातील पहिली अवस्था होती. या अवस्थेत व्यक्तीला ब्रम्हचारी राहून शिक्षण संपादत करावे लागे. मुलगा ८ वर्षाचा झाल्यानंतर त्याचे उपनयन (मुंज) केली जात असे. त्यानंतर १२ वर्ष किंवा त्यातून जास्त काळ गुरुगृही राहून त्याला विदयाभ्यास करावा लागत असे. गुरुगृही शिष्याला अपार कष्ट व अत्यंत कडक शिस्तीत रहावे लागे. ब्राम्हण, क्षत्रिय, वैश्य या वर्णाचे सर्व विदयार्थी एकत्रित राहत असत. गुरु, श्रीमंत - गरीब जेष्ठ - कनिष्ठ असा कोणताही भेद करीत नसत. शिक्षण पूर्ण झाल्यानंतर विदयार्थी गुरुदक्षिणा देत असत. या काळातील शिक्षण विनामुल्य होते.

ब) **गृहस्थाश्रम** :

अध्यन पूर्ण झाल्यानंतर विदयार्थी गुरुच्या परवानगीने घरी येत असत. विवाह करून त्याला कौटुंबिक जबाबदारी पार पाडावी लागत असे. माता पित्याची सेवा, अतिथीची सेवा, कुंटुबांचे पोषण ही महत्वाची जबाबदारी असे. हा आश्रम सर्वश्रेष्ठ मानला जात असे कारण धर्म, अर्थ, मोक्ष प्राप्ती अशी लोकांची श्रध्दा होती.

क) **वानप्रस्थाश्रम** :

गृहस्थामातील कार्य पूर्ण झाल्यानंतर आपली कौटुंबिक जबाबदारी आपल्या मुलावर सोपवावयाची व स्वत: अरण्यात जावून परमेश्वर चिंतनात वेळ घालविणे यालाच वानप्रस्थाश्रम असे म्हणतात. बाहय जगातून आपले मन काढून घेवून परमेश्वराकडे ते लागावे व मानसीक शांतता मिळविणे हा वानप्रस्थाश्रमचा उददेश होता.

ड) **संन्यासाश्रम** :

संन्यासाश्रम ही आश्रमधर्माची शेवटची पायरी. ईश्वराचे चिंतन करण्यासाठी हा आश्रम घेण्यात येत असे. सर्वसंग परित्याग करुन सर्व बंधनातून मुक्त रहावे लागत असे संन्यास घेण्याचा अधिकार पहिल्या तीन वर्गास होता. पुढे तो ब्राम्हणांकडेच दिला. इंद्रियावर ताबा, ब्रम्हचर्य, अहिंसा. सत्य, ईश्वरचिंतन इ. नियमांचे कठोर पालन करावे लागत असे. अरण्यात राहून विदयादान करावे लागत असे.

१२. **<u>शिक्षण</u>** :

गुरुगृही राहून शिक्षण घेण्याची परंपरा होती. शिक्षणात धार्मिक, वेदांचा अभ्यास, व्याकरण, तर्कशास्त्र आणि कायदा, युध्दशास्त्र इत्यादी विषयांचे शिक्षण दिले जात असे. या काळात संस्कृत भाषेला महत्व प्राप्त झाले व संस्कृत भाषेतून अनेक ग्रंथाची रचना झाली.

१३. **वैदयक शास्त्र** :

या काळात वैदयकशास्त्राचा वापर करणाऱ्यांची संख्या वाढली. कावीळ, अल्सर, डोकेदुखी, पोटाचे आजार इत्यादी विकारावर नवीन नवीन औषधांचा वापर होवू लागला. नेत्रदोष, अस्थिभंग, स्र्पदंश, जखमा अशा प्रसंगी शस्त्रक्रिया केली जात होती.

**ब) वेदकालीन आर्थिक परिस्थिती :**

प्रांरभीच्या काळात आर्य भटक्या अवस्थेत टोळया टोळयांनी हिंडत असत. कालांतराने त्यांनी नदीच्या काठावरती आपली वसतीस्थाने निर्माण केली. सुपीक जमीन, मुबलक पाण्यामुळे त्यांनी शेती करण्यास प्रारंभ केला. त्यासाठी त्यांना कष्ट करणे आवश्यक होवून बसले. त्यातूनच श्रमविभागणीचे तत्व पुढे आले. त्यातुन सामाजात विविध उदयोग, व्यवसाय करणारे वर्ग पुढे आले.

१. **शेती** :

या काळातील कृषीव्यवसाय प्रगतीपथावर होता. विविध प्रकारच्या पिकांचे उत्पादन या काळात होण्यास सुरुवात झाली. प्रामुख्याने तांदुळ, गहू, जव, बारली, मसुर, मुग, उडीद, ऊस, कापुस या पिकांचे उत्पादन घेतले जात असे. शेतीच्या मशागतीसाठी ४, ८, १२, २४ बैलांचा नांगर वापरला जात असे शेतीला पाणी पुरवठयाची सोय केली होती.कृमीकटीक, रोगराई व नैसर्गिक आपत्तीपासून शेतीचे रक्षण व्हावे म्हणून मंत्र म्हणत असत. शेतीचे पीक भरपूर यावे म्हणून यज्ञ व धार्मिक विधी करीत.

२. **पशुपालन** :

उत्तर वेदकाळात शेतीबरोबर पशुपालन व्यवसाय प्रमुख बनला. या काळात गायीला महत्व आले. गाय वैभव संपन्नतेचे प्रतिक मानले जावू लागले. गायीची हत्या व गोमांस खाणे निषिध मानले जावू लागले. गाय,बैल,म्हैस,घोडा,बकरी,हत्ती,उंट व डुक्कर, गाढव, हरीण हे त्या काळातील प्राणी होते. शेतीची मशागत, संरक्षण,युध्द,व्यापार,मांसाहार,खत,व दळणवळणासाठी पशुंचा उपयोग होत असे.

३. **विविध व्यसाय** :

या काळात उदयोग क्षेत्रात झपाटयाने प्रगती होवून त्यात विविधता निर्माण झाली. शिकारी, सारथी, शेतकरी, न्हावी, रथकार, परीट, लोहार, चांभार, सोनार, कुंभार, सुतार नाविक, कोष्टी, कोळी, रंगारी, धोबी, तेली, माळी, बुरुड, पाथरट, वडार, बेलदार, ज्योतिषी, भांडी व दारू बनविणारे व्यावसायिक समाजात होते. दळणवळणासाठी पशुंचा उपयोग होत असे.

४. **व्यापार** :

या काळात अंतर्गत आणि विदेशी व्यापारात भरभराट झाली. अनेक शहरे व बंदरे निर्माण झाली. काशी, आयोध्या,मिथिला,कंपील,विराटनगर,हस्तिनापूर व्दारका, प्रतिष्ठान,असंदीवत व गिरीव्रज ही व्यापारी शहरे उदयास आली. व्यापार जलमार्गे व भूमार्गे होत असे.धान्य,कापड, भांडी, दागिने, रथ, पादत्राणे, शस्त्रे, पशु व घरगुती वस्तूचा व्यापार चालत असे. हत्ती, बैल,रेडा, रथ, होडया व पालख्यांचा वाहतुकीसाठी उपयोग करीत.रस्ते अवघड होते.दळणवळणाची साधने अपुरी होती.

५. **चलन** :

आर्थिक व्यवहार वस्तूविनिमयाने होत असे. तसेच वस्तूविनिमयासाठी कृष्णाल, शतमान, निष्क, पाण, पाद, वाह व कार्षापण या मुद्रांचाही वापर होत असे.

६. **कर पध्दती** :

विविध व्यवसाय व व्यापाराची वाढ झाल्याने करांचे उत्पन्न वाढले. ब्राम्हण, क्षत्रिय करमुक्त होते. करांचा बोजा व्यापारी वैश्यांच्यावर असे.१/६, १/८, १/१० हया प्रमाणात शेतसारा घेतला जात असे. पशु धनावर १/५, व्यापारी १/२० आणि फळे, भाजीपाला औषधे, व मांसावर कर होते. धान्य, पैसे व पशुंच्या रुपाने कर गोळा करीत असत.

क) **धार्मिक परिस्थिती :**

१. **देवदेवता** :

उत्तर वेदकाळात धार्मिक जीवनात बरेच बदल घडून आले. ऋग्वेद काळातील देवदेवतांचे महत्व कमी झाले.इंद्र व वरुण यांचे महत्व कमी झाले. रुद्र व विष्णू यांचे महत्व वाढीस लागले. याशिवाय गंधर्व, आप्सरा यांचेही महत्व वाढले.

**२.यज्ञ व धार्मिक विधी** :

या काळात यज्ञाला महत्व प्राप्त झाले. यज्ञ केल्यास जास्त् पुण्य पदरी पडते. यज्ञामुळे स्वर्ग व मोक्ष प्राप्ती होते असा समज निर्माण झाला. पुत्रप्राप्ती, विवाह, शेतातील पीक, जन्ममृत्यु, संपत्ती, स्वर्गप्राप्ती, युध्द विजय व मोक्षप्राप्ती इ. अनेक हेतुसाठी असंख्य यज्ञ सुरु झाले. त्यामुळे हजारो ब्राम्हण पुरोहित यज्ञविधीत गुंतले. अश्वमेध, राजसुय व वाजपेय, गृहयज्ञा सारखे भौतिक व अधिभौतिक स्वरुपाचे अनेक विविध यज्ञ सुरु झाले. साध्या धर्माचे रुपांतर धार्मिक समारंभ आणि खर्चिक यज्ञ - यागांच्या धर्मात झाले. धर्मात कर्मकांडाचे महत्व प्राप्त झाले. त्यामुळे ब्राम्हण वर्गाचा प्रभाव निर्माण झाला. ब्राम्हण, परमेश्वर व भक्त यांच्या मधले मध्यस्थ बनले. ब्राम्हण वर्गाच्या वर्चस्वामुळे या कालखंडाला ब्राम्हणीयुग आणि तत्कालीन धर्माला ब्राम्हणधर्म संबोधले जावू लागले.

३.**<u>तीन ऋण कल्पना</u>** :

आपल्या जीवनाची सर्वांगीण प्रगती साधण्यसाठी त्याला अनेकांची मदत घ्यावी लागते. त्याची परतफेड करण्याचा भुमिकेतून ऋणमुक्तीची कल्पना साकार झाली. देवता ऋण, ऋषी ऋण, व आई वडिलांचे ऋण या तीन ऋण कल्पना मानल्या जात होत्या. या ऋणातून मुक्त होण्यासाठी देवदेवतांची पूजा केली पाहिजे. ऋषी पासून ऋणमुक्ती होण्यासाठी वेदांचा अभ्यास केला पाहिजे. आई वडिलांच्या ऋणातून मुक्त होण्यासाठी पुत्र प्राप्त करुन वंशाशी वाढ केली पाहिजे अशी लोकांची भावना होती.

**४.<u>वैदिक तत्वज्ञान</u>** :

अर्यांचे अध्यात्मिक तत्वज्ञान ही जगाला दिलेली फार मोठी देणगी आहे. तो संस्कृत भाषेतील अजोड ठेवा आहे. जग हे सुंदर असून जीवन व्यतीत करण्यासाठीच ईश्वराने सृष्टीची निर्मिती केली आहे असे त्यांना वाटत होते. विश्वाच्या अस्तित्वातील अंतीम सत्याचा शोध घेण्याचा प्रयत्न या काळात झाला. जीवनातील अंतिम सत्य ब्रहय आणि आत्मा यांचे महत्व वाढले. मोक्षप्राप्तीचा खरा मार्ग शोधण्याचे प्रयत्न सुरु झाले. यज्ञ पध्दतीस काही लोकांनी विरोध सुरु केला त्यामुळे नवीन विचार समाजापुढे आले. त्याच पार्श्वभुमीवर बौध्द व जैन धर्माचा उदय झाला.

## <u>सोळा महाजनपदे :</u>

गौतम बुदधांच्या काळात सोळा मोठी राज्ये अस्तित्वात होती. या राज्यांनाच महाजनपदे असे म्हणतात. जनपद या शब्दाचा अर्थ ज्या भूमीत लोक कायम निवास करून शेती आणि तत्सम व्यवसाय करून जीवन व्यतीत करतात. ती जनपदे या नावाने ओळखतात. आरंभी ही जनपदे जे क्षत्रिय राजे राज्य करीत होते त्यांच्या नावाशी निगडीत होती. पण पुढे बौध्द कालखंडात क्षत्रियांचा विस्तार झाला. शेती आणि अन्य व्यवसायही भरभराटीला आले. त्यामुळे जनपदे ही प्रदेश आणि लोकसंख्या या दोन्ही अनुंषगाने मोठी झाली. त्यामुळे ही जनपदे महाजनपदे या नावाने ओळखली जाऊ लागली. महाजनपदाच्या राज्यकर्त्यांत परस्परसंघर्ष होऊन त्यातून काही महाजनपदे नष्ट होऊन ती मगध साम्राज्यात विलीन झाली.

यापैकी १६ प्रमुख महाजनपदांची यादी ही महावस्तू या जैन ग्रंथात आहे. व्याकरणकार पाणिनीने ही आपल्या अष्टाध्यायी ग्रंथात काही महाजनपदांची यादीच दिलेली आहे. ही सर्व महाजनपदे राजकियदृष्टया सार्वभौम आणि त्यांचे व्यवहारही स्वतंत्रपणे चालत होते. या महानपदांचा विस्तृत आढावा खालीलप्रमाणे घेता येईल.

१ **<u>अंग :</u>**

इसवीसन पूर्व ६ व्या शतकात उत्तर भारतात अस्तित्वात असलेले आणि १६ महाजनपदांपैकी सामर्थ्यशाली राज्य म्हणजेच अंग होय. याची चंपा ही राजधानी होती. नगर महागोविंदाने वसविले असून, बुदधकालखंडातील भारतातील महत्वपूर्ण नगरात चंपाचा समावेश

होता. हे व्यापार व संपत्तीसाठीचे प्रसिद्ध शहर होते. या राज्याचा उल्लेख अर्थवेद, रामयणात आहेत. चंपा नदी मगध आणि अंग राज्यातून वाहत असल्याने ती त्यांची सीमा होती. पुढे अंग या महाजनपदावर मगधाधिपती बिंबिसारने वर्चस्व निर्माण केले.

२. **<u>अवंती :</u>**

इ.स.पू.६ व्या शतकात अवंती महाजनपद हे सामर्थ्यशाली होते. विंध्य पर्वतामुळेच अवंती राज्याचे उत्तर आणि दक्षिण असे विभाजन झालेले होते. उत्तर अवंतीची राजधानी उज्जैन तर दक्षिण अवंतीची महिष्मती ही होती. हा प्रदेश सुपीक आणि लोहखनिजयुक्त असल्याने ते संपन्न समृध्द होते. इसवीसन पूर्व ६ व्या शतकात प्रदयोत राजा हा पराक्रमी असून सत्तेवर होता. त्याचा पराक्रम पाहून भयाने मगधाच्या अजातशत्रूने राजगृह या राजधानी भोवती भक्कम तटबंदी केली होती.प्रदयोत हा बौध्द उपासक असल्याने अवंती हे बौध्द धर्माचे मुख्य केंद्र बनले.त्याच्या मृत्युनंतर दुबळे राज्यकर्ते सत्तेवर आल्याने हे राज्य मगधाने हस्तगत केले.

३. **<u>अश्मक :</u>**

बौध्द वाङ:मयानुसार हे राज्य गोदावरी नदीकाठी असून त्याची राजधानी ही पैठण होती. अश्मक राज्यावर इक्ष्वाकु वंशीयांनी राज्यपद निर्माण केले होते. अश्मकचा शासनकर्ता अरुणने मगधावरतीही विजय मिळवून काही प्रदेश आपल्या राज्यामध्ये समाविष्ठ केला होता. अश्मक आणि अवंती या दोन राज्यातील शत्रूत्वामुळे त्यांच्यात लढाया होत. अखेरीस अवंतीच्या राजाने अश्मकाचा पराभव करून हे राज्य आपल्या राज्यास जोडले.

४. **<u>काशी</u>** :

सूमारे ३०० चौ.कि.मी. विस्तार असलेले वाराणसी ही राजधानी असलेले काशी हे राज्य प्रभावशाली आणि वैभव संपन्न म्हणून ओळखतात. जातक कथात अनेक घराण्यांनी या राज्यावर राज्य केल्याची माहिती प्राप्त होत. दशरथ, राम, त्यांच्या वंशजांनीही काशीवरती राज्य केल्याचा उल्लेख आहे. जैन धार्मियाचे २३ वे तिर्थकर पार्श्वनाथाचे वडील अश्वसेन हे काशीचे सम्राट होते. काशी - कोसल मगध यांच्यात सतत संघर्ष होत असे. बौध्द कालखंडात काशीचे राजकिय अस्तित्व नष्ट होऊन प्रथम कोसल राज्यात आणि नंतर हे राज्य मगध सम्राज्यात विलीन झाले.

५. **<u>कोसल</u> :**

उत्तर प्रदेशातील अयोध्येच्या आसपास हे राज्य पसरलेले होते. शरयु या नदीने या राज्याचे २ भाग केलेले होते. यापैकी उत्तर कोसलची श्रावस्ती आणि दक्षिण कोसलची कुशावती या राजधान्या होत्या. तसेच आयोध्या हे महत्वाचे शहर होते. या राज्याने काशी जिंकले प्रसेनजित हा बौध्दकालीन बलाढय शासक होता. त्याने मगधाबरोबर वैवाहिक संबंध प्रस्थापित केलेले होते. परंतु पुढे कोसल - मगध संघर्षात हे राज्यही लयास गेले.

६. **<u>कुरू :</u>**

सध्या दिल्ली आणि मीरत सभोवतालचा प्रदेश म्हणजेच कूरूचे राज्य होय. कुरूची राजधानी इंद्रप्रस्थ होती. कुरु राज्यात आरंभी असलेली राजसत्ताक पदधती बदलून नंतरच्या कालखंडात तेथे प्रजासत्ताक राजवट आली. महाभारतातील कौरव कुरुवंशीयच होते. इ.स.पू. ६ व्या शतकापासून मात्र कूरुचे महत्व घटत गेले.

७. **<u>वृज्जी :</u>**

बिहारच्या उत्तर भागामध्ये हे राज्य होते. तेथे आठ वेगवेगळया जमाती होत्या त्यापैकी विदेह, लिच्छवी, वज्जी या महत्वाच्या होत्या. वैशाली हे राजधानीचे ठिकाण होते. तिला तिन्ही बाजूनी भक्कम तटबंदी आणि टेहाळणी बुरुज होते. लिच्छवीच्या गणराज्यातील ७,७०७ अशा प्रतिनिधीची एक सभा राज्यकारभार करत होती. प्रतिनिधींमध्ये राजे, उपराजे, सेनापती, भांड:रनिक इत्यादीचा समावेश होता. प्रत्यक्ष दैनिंदीन कारभार पाहण्यासाठी अष्टकुल (मंत्रिमंडळ) होते. यात आठ महत्वाच्या मंत्र्यांचा समावेश होता.

८. **<u>वत्स :</u>**

यमुनेच्या तीरावरती असलेली वत्स राज्याची राजधानी कोशांबी होती. हे एक व्यापारी केंद्र होते. भगवान बुदधाच्या कालखंडात वत्स राज्यात उदयन हा प्रजाहितकारक शासक होऊन गेला. त्याने अवंतीचा राजा प्रदयोतच्या मुलीशी विवाह केला. उदयनने राज्यक्षणार्थ सीमेवरती किल्ल्याची उभारणी केली. त्यांच्या लष्करामध्ये हत्तीची संख्या प्रचंड होती. प्रारंभी उदयन हा बौध्दधर्मविरोधी होता. परंतु त्याने बौध्द धर्म स्वीकारला व तो राज्याचा धर्म म्हणून जाहीर केला.

९. **<u>शुरसेन :</u>**

चेदीच्या पश्चिमेस शूरसेन राज्य असून मथुरा ही त्याची राजधानी होती. ते विदयेचे महत्वाचे केंद्र होते. महाभारत, पुराणातही या राज्याचा उल्लेख आहे. शूरसेनचा राजा हा बुदधाच्या समकालीन होता. त्याच्यामुळेच मथुरा आणि आसपासच्या प्रदेशात बौध्द धर्माचा प्रसार मोठया प्रमाणावरतीघडून आला. मेगॅस्थेनीस या चंद्रगुप्ताच्या दरबारी असलेल्या ग्रीक वकिलाने मथुरा हे कृष्ण भक्तीचे एक मोठे केंद्र आसल्याचा उल्लेख केलेला आहे.

१०. **<u>मत्स्य :</u>**

राजस्थानातील बहुतांश प्रदेश या राज्यात येत असून विराटनगर ही त्याची राजधानी होती. पांडव अज्ञातवासात असताना या प्रदेशात त्यांनी वास्तव्य केलेले होते. विराटनगराशेजारीच उपलव्य नावाचे नवीन नगर मत्स राज्यात होते. नंतरच्या इतिहासात मात्र मत्स्य राज्याचा उल्लेख नाही. कदाचित शेजारील चेदी राज्याने हे जनपद हस्तगत केले असावे व नंतर ते मगध

साम्राज्यात विलीन झाले असावे. वैराट येथील अशोकाच्या शिलालेखात मत्स्य या राज्याचा ओझरता उल्लेख आहे.

११. **<u>मल्ल :</u>**

सध्याच्या गोरखपुर जिल्हयात हे मल्ल जमातीचे राज्य होते. महाभारततही या जमातीचा उल्लेख आहे. या जमातीचे राज्य हे नऊ विभागात विभागलेले होते. कुशीनगर आणि पावा ही दोन महत्वाची ठिकाणे याच राज्यात होती. मल्ललोक शूर, लढवय्ये हेते. बौध्द धर्माविषयी त्यांना आस्था होती. गौतम बुध्दांचे निर्वाणही याच कुशीनगर येथेच झाले होते. हे राज्य मगधांनी जिंकले.

१२. **<u>मगध :</u>**

सध्याच्या बिहारराज्यातील पटना, गयाचा प्रदेश मगध राज्यामध्येच समाविष्ठ होता. मगधाची राजधानी गिरीव्रज (राजगृह) होती. महाभारत काळात तेथे बौध्द घराण्याची सत्ता होती. जरासंध हा मगधाचाच राज्यकर्ता होता. या प्रदेशावरती अनार्यांची सत्ता असलेने या जनपदाचा वाङ्:मयातही उल्लेख हा तिरस्कारपूर्ण केलेला आहे. पूढे मौर्य शासकांनी या महाजनपदावर आपली सत्ता प्रस्थापित करून साम्राज्यात रुपांतर केले.

१३. **<u>गांधार :</u>**

पाकिस्तानातील पेशावर, रावळपिंडी या प्रदेशात गांधार हे महाजनपद होते. गंधारची राजधानी तक्षशीला हे विदया आणि कलेचे माहेरघर होते. तेथेच विदयपीठही होते. ख्यातनाम पाणिनी हा गंधारचाच रहिवासी होय. इ.स.पू.६ व्या शतकात पर्शियाच्या राजाने गांधार देश जिंकून आपल्या ॲकमिनियन साम्राज्यामध्ये समाविष्ठ केले.

१४. **<u>चेदी :</u>**

या वंशाच्या दोन वसाहती अनुक्रमे नेपाळ आणि बुदेलखंडात होत्या. बुदेलयखंडातील शाखेचे राजधानीचे ठिकाण कौशांबी तसेच रावतीमती ही नेवाळच्या शाखेची राजधानी होती. यांची एक शाखा कलिंग येथेही होती. भगवान श्रीकृष्णाने ज्या शिशुपालाचा वध केला तो चेदीचाच राजा होता.

१५. **<u>कंबोज :</u>**

भारताच्या वायव्येकडील हे राज्य असून राजपूर ही त्याची राजधानी होय. अशोकाच्या शिलालेखात गांधार आणि कंबोजचा उल्लेख आहे. येथे प्रथम राजसत्ताक पध्दती होती.परंतु नंतर त गणराज्य बनले. महाजनपदामध्येही कंबोजचा उल्लेख एक महत्वाचे महाजनपद असा आहे.

१६. **पांचाल :**

पांचाल महाजनपदाचा उल्लेख हा जातककथा, जैन वाङ: मय, संस्कृत वाङ: मय, यामध्ये सापडतो. भागिरथी नदीमुळेच पांचालचे उत्तर पांचाल आणि दक्षिण पांचाल असे दोन भाग पडले होते. पांचाल आणि कुरूच्या राज्यात उत्त्र पांचालसाठी संघर्ष होत असे. प्राचीन भारतातील सांस्कृतिक आणि व्यापारी केंद्र म्हणून मान्यता पावलेले कनोज हे पांचालच्या राज्यातच आहे. इ.स.पू ५ व्या शतकापासूनच पांचालचे अस्तित्व नष्ट झाले.

या महत्वाच्या १६ महाजनपदामध्ये सतत संघर्षाचेच वातावरण असे त्यातून अनेक महाजनपदे ही नष्टही झाली. या संघर्षातूनच पांचाल, शूरसेन, कुरु, काशी, अशा महाजनपदांचे महत्व् कमी होत गेले. परंतु यात मगध सम्राज्य स्वरूपात उदयास आले. आर्थिक परिस्थितीची समृदधता,भौगोलिक अनुकुलता, शूर सेनानी व सैनिक, थोर राज्यकर्त्यांची परंपरा या कारणामुळेच मगधाचे महाजनपद हे साम्राज्यात रुपांतरीत होऊन उर्वरीत १५ महाजनपदांवर प्रत्यक्ष अथवा अप्रत्यक्षपणे मगधाने वर्चस्व प्राप्त केले.

## भारतातील दुसऱ्या नागरीकरणाची कारणे :

**नागरीकरण**

नागरीकरण हा इंग्रजीतील URBAN या शब्दापासुन बनवेला असुन URBAN हा URBSया लॅटिन भाषेतील शब्दापासुन निर्माण झालेला आहे. URBS या लॅटीन शब्दाचा अर्थ नगर अथवा शहर असा होता.

नागरीकरण ही बहुअंगी परीवर्तवशील व गतीशील प्रकीया असुन उदयोगशिलतेमुळे ग्रामीण जीवनपध्दतीमध्ये मुलगामीबददल घडून त्यांचा विकास होणे म्हणजे नागरीकरण होय यावरुन परीवर्तनशीलता सर्वागीण प्रगती होऊन नगर किंवा शहराचे रुप धारणकरण्यांच्या प्रकीयेला “नागरीकरण” असे प्रमुख लक्षण मानले जाते.नागरीकरण हे आर्थिक प्रगतीचे प्रमुख लक्षण मानले जाते.

## प्रस्तावना :

भारतात प्राचीन काळापासुनच नागरीकरण प्रकीया निरंतरपणे चालू होती. सिंधु संस्कृतीचा विनाशांची प्रकीया सुरु असताना आर्यआगमन झाले व त्यानी वैदीक संस्कृतीचे एक नवीन दालन उघडले. वेदकाळात राजकीय, आर्थिक सामाजिक व सांस्कृतीक क्षेत्रांत बददल होण्याची प्रकीया संथगतीने सुरु झाली. वेदोत्तर काळात त्या बदलाचा वेग अधिक प्रमाणात झाला. त्यामुळे इ.स.पु. ६०० पासुन राजकीय, आर्थिक व सांस्कृतिक परिस्थितीमध्ये मुलगामी बददल होऊन ‘राज्य’ ही संख्या उत्क्रांत होत जाऊन त्यास नियमबध्द घटनात्मक स्वरुप प्राप्त झाले. पुढे राजांच्या दैवी अंग सिदधांतामुळे राजा व प्रजा यांच्यामध्ये राजाला सर्वोच्च अधिकरांची प्राप्ती झाली त्यामुळे करसंकलन व संरक्षण या गोष्टीचा सर्वेसर्वा राजा झाला व प्रादेशिक राज्यांचा विकास होऊन नागरीकरण प्रकीयेस चालना मिळाली.

भारतातील नागरीकरणाचे दोन विभाग पडतात

अ) १ ले नागरीकरण: सिंधू संस्कृतीतील नगरे.

ब) २ रे नागरीकरण: गंगा यमुना मैदानातील शहरे.

कालखंड : इ.स.पूर्व ६०० ते इ.स.पु ३२१

## दुसऱ्या नागरीकरणाची कारणे

### १. नागरीकरणांस अनुकुल भौगोलिक परस्थिती :

गंगेचे मैदान हे दुसऱ्या नागरीकरणाची उगमभुमी आहे. उत्तर वैदीक काळानंतर प्राचीन भारताच्या आर्थिक जडणघडणीचा केंद्रबिंदु हा शेती हा होता. प्राचीन कालीन भटक्या टोळयांना स्थिर अवस्था प्राप्त करुन देण्यासाठी शेती हा मुलाधार ठरला.शेतीसाठी आवश्यक असणारी जमीन व पाण्याची मुबलकता ही गंगेच्या दुआब प्रदेशात अधिक अनुकुल असल्याने नागरीकरणांस पोषक भौगोलिक परस्थिती व प्राथमिक गरजांची पुर्तता यामुळे व्दितीय नागरीकरण घडून आले

### २. प्राचीन काळातील अंतर्गत व बहीर्गत व्यापार

शेती केंद्रीत अर्थव्यवस्था व शेतीसाठी अनुकुल भौगोलिक परस्थीती यामुळे अतिरीक्त् उत्पादनांत वाढ झाली. त्याच बरोबर लोखंडांच्या शोधामुळे व व्यापारापासुन बनविल्या जाणाऱ्या शेतीशी निगडीत आवजारे उदा नांगर, कुंदळ, फावडे, विळे, चाकु, खिळे, बाण इत्यादीमुळे प्रारंपारिक शेतीमध्ये बदल होऊन श्रमांची बचत व अतिरिक्त उत्पादनांत वाढ झाली. त्यामुळे उत्पादीत झालेल्या अतिरिक्त उत्पादनाला विकण्यांच्या अनुशंगाने अंतर्गत आणि बहिर्गत व्यापारांचा विकास होऊ लागला. व्यापारामध्ये प्रामुख्याने मीठ, मणी, मातीची भांडी, हस्तीदंताच्या वस्तू काचसामान तसेच धातूपासून बनविलेल्या उपकरणाचा समावेश होता एकदंरीत शेतीच्या विकासामुळे अंतर्गत व बहीर्गत व्यापारास चालना मिळून व्यापारी केंद्राचा उदय झाला व त्यातून नागरीकरण घडून आले.

### ३. लोखंडाचा वापर व इतर तंत्रज्ञान :

गंगेच्या मैदानामध्ये नागरपूर्व व नागरीकरण काळांत इ.स.पूर्व १ल्या शतकांच्या मध्यावर धातुविज्ञान पुर्ण पणे विकसीत झाले होते. लोहयुगीन संस्कृतीचे ठळक वैशिष्टय म्हणजे प्रथम लोखंडाचा हत्यारासाठी उपयोग व नंतर हळूहळू इतर वस्तूसाठी व घरगुती वस्तूसाठी त्याचा उपयोग केला जाऊ लागला इ.स.पुर्व ८०० च्या सुमारास केवळ लोखंडाचा वापर विशेषता: हत्यारांसाठी माहीत होता परंतू काळपरत्वे चांगल्या दर्जाच्या लोखंडाचा पदधतीशीर वापर नंतर सुरु झाला. उत्तर राजस्थानमधील जोधपुरच्या उत्खननांत कच्चा धांतूना वितळून घडविण्यासाठी भटट्या सापडल्या आहेत. शेतीशी आवश्यक आसणाऱ्या अवजारांच्या निर्मितीसाठी लोखंडाचा मुलगामी वापर यामुळे कृषी केंद्रीत अर्थव्यवस्था हितकारक होऊन नागरीकरणास वाव मिळाला.

४. **<u>राजकीय परिस्थिती :</u>**

'ऐतरेयब्राम्हण' मध्ये वेदोत्तर काळात विविध प्रदेशात असलेल्या विविध राज्याचा नामोल्लेख आलेला आढळतो. "राजा हा दैवी अंश आहे" ही संकल्पना लोकमान्य होऊन राजा हा देवाकडूनच पाठविला गेला असल्याने तो प्रजेचा त्राता आहे. त्यामुळे त्यास सर्वाधिकार प्राप्त होतात. या संकल्पनेचा पगडा प्रजेच्या मनांत निर्माण झाल्याने प्रशासन व्यवस्था व प्रजेचे कल्याण यासाठी कर गोळा करण्याचे हक्क राजाला मिळाले परीणामी करसंकलन व प्रशासन व्यवस्था चांगलीच रुजली होती.'राजा' ही संस्था संरक्षण, न्यायदान, समाजनियमन, कल्याणप्रद योजना इत्यादी क्षेत्रांत सर्वसत्ताधीश मानली जाऊ लागली. राजकीय स्थीरतेमुळे व राजाच्या सर्वकष सत्तेमुळे छोटया राज्याचा विकास होऊन नागरीकरणास चालना मिळाली.

५. **<u>नैसर्गिक आपत्ती :</u>**

पुरातत्व संशोधकाच्या मते दूसऱ्या नागरीकरणाच्या दृष्टीने नैसर्गिक आपत्ती हे देखील अंत्यंत महत्वपूर्ण कारण होय कृषीक्षेत्रात लोखंडी साधनाचा वापर न झाल्याने, शेतीची सुधारीत पदधत्तीचा अभाव नदयांची बदलत्या पात्रामुळे व अवर्षण इत्यादी नैसर्गिक कारणामुळे प्राथमिक गरजांच्या पुर्ततेच्या अनुषंगाने वस्त्यांचे स्थंलातर इत्यादी सुपीक भुप्रदेश इत्यादीमुळे पुढे त्यांचा विकास होऊन नागरीकरण घडून आले.

६. **<u>कृषीतंत्रात झालेले बदल</u>** :

जमिनीच्या प्रतवारीनुसार तत्कालीन काळांत कृषीक्षेत्रांची विभागणी होऊन कृषी व्यवसायात वाढ झाली. शेतीसाठी पाण्यांचा वापर, जमिनीच्या उतारानुसार मशागत अशा महत्वपूर्ण कृषीतंज्ञाचा वापर करण्यात आला. शेतीसाठी आवश्यक पुरक अवजारासाठी लोखंडाचा वापर यामुळे कृषीलागवड क्षेत्रामध्ये देखील वाढ झाली.

शेतीसाठी आवश्यक असे वार्षिक कॅलेंडर २७ नक्षत्रात विभागुण बनविण्यात आले होते. वार्षिक हवामानानुसार पिकांची लागवड करण्यात येऊ लागली त्यामुळे वर्षातुन सुपीक भुप्रदेशांमध्ये २ किंवा ३पिके घेतली जाऊ लागली. त्यामध्ये फळझाडाची लागवड अन्नधान्य पिकांची लागवड ही प्रामुख्याने केली जाऊ लागली. कृषीतंत्रात बदल झाल्याने अतिरिक्त उत्पादनांत वाढ झाली वाढत्या लोकसंख्येस रोजगार, अन्नधान्य, व्यवसाय इत्यादी भरपुर प्रमाणात उपलब्ध झाल्याने नगरांच्या संख्येत वाढ झालेली आढळते.

७. **<u>नाण्याचा वापर :</u>**

इ.स.पू ६ व्या शतकापासून ग्रहउभारणीत लाकडाचा वापर मोठया प्रमाणात झाल्याचे उत्खननांत आढळते गंगेच्या पठारावर मातीची घरे ही सापडलेली आहेत. त्याबरोबर कच्च्या व भाजीव विटांचा वापर घरांच्या बांधणीसाठी झालेला आढळतो. सदर ठिकाणी झालेल्या उत्खननांत चांदी व तांबे या धांतूच्या नाण्यावर कोरीव अक्षरे सापडली असून त्याचा उपयोग तत्कालीन काळांत व्यापारासाठी केला जात होता. नाण्यामुळे करसंकलन सोपे झाले. लोकांना बचत करणे

शक्य झाले. त्याचप्रमाणे नाण्याचा रुपात कर्ज देणारा नवा सावकार वर्ग तयार झाला चांदीची ‘शतमान’ व ‘कर्षापाण’ नाणी व तांब्याची ‘मासा’ व ‘काकिणी’ इ. नाणी आस्तिव्तात होती. त्यावर टेकडी,वृक्ष, प्राणी, साप मानवी आकृती फुले भैामितीक आकृत्या, धार्मिक चिन्हे दोन्ही बाजूला कोरलेली असत.

अंतर्गत व बहीर्गत व्यापारांसाठी “वस्तूविनिमय पद्धती” ऐवजी रोखनकद पध्दती चा अवलंब केल्याने व्यापारास चालना मिळाली व नगराचा आर्थिक विकास होऊन नगराचा संख्येत वाढ झाली.

८. **कारागिर वर्गाचा उदय :**

प्राचीन काळात काही गावे त्यांच्या परंपरांगत व्यवसायामध्ये गुंतलेली होती. त्यामध्ये लोहार, सुतार, कुंभार, विणकाम करणारी, टोपल्या विणणारी इत्यादीमध्ये विशिषत पारंगत असणारी गावे कच्च्या मालांच्या उपलब्धततेनुसार वास्तव्यास राहु लागली त्याशिवाय ही गावे रस्ते व व्यापारी केंद्राशी जोडली गेली. विशिष्ट व्यवसायांतील कारागीर एकाच ठिकाणी गोळा होत असल्यामुळे अशा केंद्रातुन कच्च्या मालांची सुलभ उपलब्धता आणि उत्पादीत कलात्मक वस्तूचे वाटप होत असल्यामूळे कारागिर वर्गाच्या बरोबर नगरांचा विकास होतो. अश्या नगरांची बाजारपेठा व व्यापारी केंद्रे म्हणून विकास झाला.

उदा. वैशाली, श्रावस्ती, चंपा,राजगृह, कैाशबी

# गणराज्य :

**प्रास्ताविक -**

वैदिक काळापासून भारतात अनेक राज्यामध्ये जसे राजतंत्र होते. तसेच गणतंत्र ही होते. वंशपरपरेने जेथे राजतंत्र नव्हते अश्या राज्यांना गणतंत्र किंवा गणराज्य म्हणत. हे भारतीय समाज संस्थेचे पहिले स्वरुप होते. गणराज्यात शासन समाजातील विविध वर्गाच्या हातात असे. त्यात सामाजिक दर्जा महत्वाचा मानला जाई. त्यात ही क्षत्रिय वर्णाच्या हातात सूत्रे असत. प्रसंगी श्रीमंत, चतुर, ज्ञानी, अनुभवी, मुत्सरी, वयोवृध्दी व्यक्तीच्या हातात सत्ता राहत असे गौतमबुध्दाचे वडील शाक्य गणराज्याचे होते. त्याशिवाय जनकाचे विदेहचे, वैशाली, लिच्छवीचे, पावकाचे मल्ल, पिप्पल वनचे - मोरिया ही गणराज्य अधिक शक्तीशाली होती.

**राज्यकारभार -**

लोकमंडळाच्या सहकार्याने व मदतीने गणराज्यांचा कारभार चालत असे. न्याय, अंमलबजावणी सर्व नागरिक एकत्र येवूनच होत राजधानीच्या ठिकाणी सभागृहात, संस्थागारात कामकाज चालत असे. कौटिल्याच्या अर्थशास्त्रात अश्या अनेक गणराज्याचा उल्लेख आहे. लिच्छवी कुरु, पांचाल, कंबुज, मद्रक, मालव सौराष्ट्र, वैराठ या सारखी अलेक्झांडरच्या आक्रमणाच्या वेळी वायव्य भारतात गणराज्ये असल्याचा उल्लेख त्यांच्याबरोबर आलेल्या इतिहासकारांनी केलेला आहे. मौर्य पूर्व भारतात उत्तर कुरुंचे गणराज्ये प्रसिध्द होती.क्षुद्रक,

मल्ल, अंधक गणराज्ये शौर्यासाठी प्रसिद्ध होती राजकीय सामर्थ्यासाठी लिच्छवीचे तर वृज्जीचे गणराज्य ऐक्य, न्याय, समता व तत्वज्ञानासाठी प्रसिध्द होते. शाक्य राष्ट्रप्रेमी होते. मौर्यकाळात सुध्दा काही गणराज्य अस्तित्वात होती.

**गणराज्य पध्दती -**

प्रशासन लोकशाही पध्दतीचे होते. अंतीम सत्ता जनतेच्या हातात होती. सर्व लोक काही लोकप्रतिनिधींची निवड करीत असत. प्रतिनिधीची संख्या हजारामध्ये असे. लोकसभा सदस्यांना राजा संज्ञा होती तर त्याच्या पुत्राला उपराजा म्हणत गणराज्यात प्रतिनिधींची निवड विशिष्ठ् काळासाठी होत असे त्यांची निवासस्थाने राजधानीच्या ठिकाणी असत त्यांची मालमत्ता, शेती, व्यवसाय ग्रामीण भागात असे गावागावातून त्यांची निवड होत होती. गांवातील योग्य उत्तम न्यायी प्रामाणिक चारित्र्यवान नागरिकांची निवड जनता करीत असत. राजधानीच्या ठिकाणी सभागृह असे तेथे एकत्र जमून निर्णय घेतले जात होते सर्व प्रश्नांची चर्चा होत असे. वेगवेगळया प्रश्नाविषयी शिष्टमंडळ, संवाद कमिटी नेमली जात असे. सभासदास गणतिथ म्हणत असत. कामकाज पाहण्यासाठी गणपूरक अधिकारी असत. सभासद कायदे नियम तयार करीत.

**कार्यकारी समिती -**

लोकसभेचे कामकाज, पाहणारी मध्यवर्ती गणराज्य समिती होती. मध्यवर्ती समितीकडून कार्यकारी समितीच्या सदस्यांची निवड केली जात असे. राज्यकारभार करणे राज्यात शांतता व सुव्यवस्था राखणे, सैन्याचे युध्द प्रसंगी नेतृत्व करणे न्यायदान करणे, गुन्हेगारांना शिक्षा करून त्याची अंमलबजावणी करणे इत्यादी कामे कार्यकारी समिती सदस्यांना करावी लागत होती.

**गणराज्याच्या ऱ्हासाची कारणे**

१. **ब्राम्हणवर्गाचा रोष व विरोध -**

गणराज्य पध्दतीमध्ये ब्राम्हण वर्गाला कोणतेही महत्वाचे स्थान नव्हते. त्यांना दानधर्म, दक्षिणा, धनलाभ नव्हता.त्यामुळे ते असंतुष्ट नाराज होते. त्यामुळे त्यांनी आपल्या बुध्दीच्या सहाय्याने गणराज्याची बदनामी करून साहित्यग्रंथात त्यांचे अयोग्य वाईट वर्णन केले गणराज्य व्यवस्थेला बदनाम केले

२. **सामर्थ्यशाली राजांच्या कडून पराभूत -**

अजात शत्रू अलेक्झांडर चंद्रगुप्त मौर्य, पुष्यमित्र शुंग,कनिष्क, समुद्रगुप्त यासारख्या सामर्थ्यशील राजांनी छोटया गणराज्यांचा पाडाव केला.

३. **गणराज्यातील सर्व प्रकारची सत्ता समाजातील विशिष्ठ वर्गाच्या हाती एकवटली-**

प्रामुख्याने क्षत्रिय वर्गाच्या हातात होती. सर्व अधिकार व हक्क त्यांच्याकडे एकवटले होते प्रत्येक क्षेत्रात त्यांची मक्तेदारी निर्माण झाली. त्यामुळे त्यांच्याकडे अहंकार, अहभाव,

अभिमान वाढून दूराग्रह वृत्ती वाढली बाकीचा वर्ग उपक्षित राहिला. त्यामुळे सामाजिक विषमता, दुराभाव, कटुता निर्माण झाली. राजा व सभाध्यक्ष ही एकाच कुटुंबात एकवटलेले होते. त्यामुळे लोकशाही प्रकिया मागे पडली.

४. **<u>काळाच्या ओघात गणराज्यसत्ताक पध्दतीपेक्षा राजसत्ताक पध्दती सरस ठरली.</u>**

गणराज्ये छोटी छोटी असल्यामुळे परचक्रास तोंड देण्यास समर्थ ठरली नाहीत. राजसत्ताक पध्दतीत राजा ईश्वराचा अंश मानल्यामुळे दैवी ठरला. श्रेष्ठ गुणवान राजांच्या कर्तत्वामुळे राजसत्ताक पध्दती लोकप्रिय ठरली. राजांनी लोककल्याणकारी सत्ता निर्माण केली. त्यामुळे गणराज्ये मागे पडली.

५. **<u>अंतर्गत कलह</u> -**

गणराज्यात अनेक दोष निर्माण झाले गटबाजी, हेवेदावे, परस्परातील स्पर्धा, मत्सर व्देष वाढला. त्यातून कटकारस्थाने खून मारामाऱ्या होवू लागल्या. वृध्द ज्ञानी, श्रेष्ठ यांच्या बदलचा आदर नष्ट झाला. गणराज्यांतील ऐक्य, गणनिष्ठा, नितिमत्ता, चारित्र्यशील, सदगुणांचा ऱ्हास होत गेला. गणराज्यातील संघर्ष त्याच्या ऱ्हासास कारणीभूत ठरला.

६. **<u>परकीय आक्रमण</u> -**

परकीय साम्राज्यवादी आक्रमणापुढे छोटी गणराज्ये टिकाव धरु शकली नाहीत.
अश्या रीतीने वरील वेगवेगळया करणांनी गणराज्ये नष्ट झाली.

## <u>जनपद :</u>

जनपद या शब्दाचा उल्लेख प्राचीनकाळातील ब्राम्हणे व उपनिषदे या वैदीक वाङःमयात आलेला आढळतो. बौध्द वाङःमयात तत्कालीन लोकांची आर्थिक व सामाजिक परिस्थितीत होणाऱ्या बदलांच्या माहीती मध्ये नगर, ग्राम, निगम, जनपद ,महाजनपद यांचा उल्लेख आलेला आढळतो.अनेक इतिहासकाराने जनपदाची व्याख्या पुढीलप्रमाणे दिली आहे ज्यावेळी भ्रमणशील जन'चे सदस्य् एका निश्चित ठिकाणी वास्तव्य् करुन स्थायी जीवन जगू लागले त्यांच्यात राजकीय एकता निर्माण झाली त्यावेळी हे 'जन' जनपद म्हणून ओळखले जाऊ लागले अनेक गावे आणि शहरे मिळून जनपद निर्माण होत होती काशीकरांच्या मते , "अनेक गावांचा समुदाय म्हणजे जनपदे होय. कालांतराने मोठी जनपदे लहान जनपदाला जिंकून घेऊ लागली. मौर्यकाळापूर्वी कुरु व पांचाल ही प्रमुख जनपदे अस्तिवात होती. अशा रीतीने लहान जनपदे मोठया जनपदात विलीन झाली आणि या जनपदाला महाजनपदाचे स्वरूप प्राप्त् झाले.बौध्द आणि जैन साहित्यात सोळा महाजनपदाचा उल्लेख आलेला आहे.

**प्र.१ला खालील विधानात रिकाम्या जागी योग्य पर्यायी शब्द लिहा.**

१.मॅक्स मुल्लरच्या मते आर्य ...........................येथील होते.

अ) भारत ब) मध्य प्रदेश क) उत्तरध्रुवीय ड) युरोप

२. स्वामी दयानंद सरस्वती यांच्या मते आर्यांचे मूळ वस्तीस्थान..................होते.

अ) तिबेट ब) उत्तरध्रुव क) भारत ड) जर्मनी

३. वेदकाळात कुटुंब प्रमुखास ...........................असे म्हणत.

अ) गृहपती ब) नृपती क) गृहस्थी ड) कुटुंबपती

४. आर्यांची युध्द व पर्जनदेवता .................................होती.

अ) इंद्र ब) सुर्य क) अग्नी ड) बृहस्पती

५. वैदीक काळातील..............................स्त्रियांनी ऋचांची रचना केली.

अ) लोपामुद्रा,आपाली ब) विभावरी,गौरी क) अप्सरा, गांधर्वी ड) मिता, आम्रपाली

६. आर्यांची आरोग्य देवता........................आहे.

अ) पृथ्वी ब) सोम क) रुद्र ड) विष्णू

७. उत्तर वेदकाळात .................................या विदुषी स्त्रीया होत्या.

अ) गार्गी, मैत्रेयी ब) शालमली, रुद्रा क) वैदही- सीता ड) रुजुता - मंथना

८. उत्तर वेदकाळात.................................या देवतांचे महत्व वाढले.

अ) रुद्र व विष्णू ब) इंद्र व पर्जन्य क) सुर्य व उषादेवी ड) आकाश व पृथ्वी

९. .............................ऋण, ऋषीऋण, व आई वडीलांचे ऋण या तीन ऋण कल्पना आर्य लोक मानत असत.

अ) पृथ्वी ब) गोमाता क) देवता ड) भूमाता

१०. उत्तर वेद काळात ....................................हे करमुक्त होते.

अ) ब्राम्हण,क्षत्रिय ब) वैश्य, शेतकरी क) कारागिरी, व्यापारी ड) शिंपी, रंगारी

११. इ.स.पू. ६ व्या शतकात भारतात..............................इतकी महाजनपदे होती.

अ) १४ ब) १२ क) १६ ड) २०

१२. ...................................ही अवंतीची राजधानी होती.

अ) उज्जैन ब) वैराट क) राजगृह ड) चंपा

१३. .................................हा वत्सचा महान राजा होता.

अ) प्रदयोत ब) अजातशत्रू क) उदयन ड) प्रसेनजीत

१४. गौतम बुध्दांचे वडील......................गणराज्याचे होते.

अ) शाक्य २) मोरिया ३) वैशाली ४) काशी

१५. गणराज्यातील सभासदास .........................म्हणत.

अ) गणतिथ ब) प्रतिनिधी क) गणश्री ड) गजपत

**प्र.2 रा टिपा लिहा.**

१. आर्यांच्या मूळ वस्तीस्थाना संदर्भातील वेगवेगळे सिध्दांन्त.

२. वेदकालीन स्त्रियांची परस्थिती.

३. वेदकाळातील धार्मिक जीवन

४. आश्रम व्यवस्था

५. उत्त्र वेदकाळातील धार्मिक जीवन

६. सभा व समिती.

७. व्दितीय नागरीकरणाची कारणे.

८. गणराज्य

**प्र.३ रा खालील प्रश्नांची थोडक्यात उत्तरे लिहा.**

१. वेदकाळातील सामाजिक जीवनाची माहिती दया.

२. वेदकाळातील सामाजिक व आर्थिक जीवनाची माहिती सांगा.

३. उत्तर वेदकाळातील सामाजिक व आर्थिक जीवनाची माहिती दया.

४. १६ महाजनपदांची माहिती सांगा.

**प्र.४ था जोडया जुळवा**

| | |
|---|---|
| १ लोकमान्य टिळक | सिंधु संस्कृती |
| २ निष्क | दि आर्टिक होम इन दी वेदाज |
| ३ बली | वरुण, मित्र उषा, सविता |
| ४ आर्यांच्या स्वर्गस्थ देवता | वस्तुविनिमयाचे साधन |
| ५ पहिले नागरीकरण | धान्य, पशुंच्या वर आकारलेला कर |